# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/१२/२०२१ (रविवार)

### —: बुटीबोरी येथील जुगार अड्‌यावर स्थानिक गुन्हे शाखेची धाड :—

दिनांक २५/१२/२०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण चे पथक पोलीस ठाणे बुटीबोरी परिसरात पेट्रोलींग करीत असता गोपनिय सुत्राकडुन खात्रीशिर माहिती मिळाली की, मौजा वाठोडा शिवारातील दिलीप मस्के यांचे शेतातील टिनाचे झोपडी मध्ये काही इसम हे जुगार खेळत आहे. अशा माहीती वरून सदर पथकाने सापळा रचुन घटनास्थळावर जावुन रेड केली असता जुगार खेळणारे इसम १) चंदु देवरावजी अवचट, २) प्रभाकर महादेव बडोदेकर, ३) महेंद्र भैयालाल तांबे, ४) प्रवीण गणपत पाटील, ५) सचिन याशवंतराव कपाटे, सर्व रा. बुटीबोरी यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन जुगार खेळण्याचे साहीत्य, ५२ ताशपत्ते, नगदी ११६३०/—रू, ४ मोबाईल संच किं. ४०,०००/—रू, ३ मोटर सायकल किं. १,६०,०००/—रू असा एकुण २,११,८७०/—रू चा माल जप्त केला. सदर घटने बाबत पोलीस ठाणे बुटीबोरी येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस ठाणे बुटीबोरी करीत आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिटट्रावार यांचे आदेशाने पोहवा गजेंद्र चौधरी, पोहवा महेश जाधव, पोना रामा आडे, पोशि अमृत किनगे यांनी केली.



### —: घरफोडी :—

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत उमरेड शहर येथील अडाळवाले ले आउट निवासी विशाल गंगाधर सावरकर हे दिनांक २५/१२/२०२१ रोजी आपले घराला कूलूप लावून आपले पारिवारसह आंभोरा येथे दर्शना करीता गेला होते घरी परत आले असता त्यांना घराच्या मागील दाराचे कोंडा तुडलेला दिसला तेव्हा पत्नीसह त्यांनी घरातील कपटाची पाहणी केली असता १) राणी हार ०४ तोळयाचा सोनाचा कि .१९२०००/—, २)सोनाचे ब्रासलेट २५ ग्रॅम कि १२००००/—, ३)सोनाचे कानातील डुल ९ग्रॅम कि ४३२०० /—,४)सोनेची अंगठी २ग्रॅम कि ९६००/— ५) पायपटया ४०ग्रॅम चांदीच्या कि २००००/— ६) सोनाची नथ २ग्रॅम कि ९६००/— ७) चांदीचा कडा १०ग्रॅम कि ५०००/— ८) नगदी २७०००/— असा एकुण ४२६४००/— चा माल कोणतरी अज्ञात इसमानी चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी विशाल गंगाधर सावरकर वय ३४ वर्ष रा अडाळवाले ले आउट उमरेड यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपीविरुध्द पो.स्टे. उमरेड येथे अप क्रमांक ८१८/२०२१ कलम ४५४,३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास यशवंत सोलसे पोलीस निरीक्षक उमरेड मो.क्र.. ७०३८०४६३९९ हे करित आहे.

## —: चोरी (रेतीची) :—

पो.स्टे. बेला :— अंतर्गत ०६ किमी अंतरावरील आष्टा ते पाटी मार्गावर दिनांक २५/१२/२०२१ रोजी बेला पोलीस स्टेशन चे पथक पेट्रोलिंग करित असतांना त्यांनह टॅक्टर क्र. एम.एच. ४० बीजे ४८५२ मध्ये रेती वाहतुक करतांना मिळून आलेल्या ट्रक्टर चालक यास थांबविले असता ट्रक्टर चालक आपल ट्रक्टर सोडून पळून गेला नमुद ट्रक्टर मध्ये अवैध रित्या विनापरवाना काळी रेती वाहतूक करत असतांना मिळून आला. मोक्यावरून एक टॅक्टर ट्रॉलीसह की. ३,००००० रूपये व एक ब्रॉस काळी रेती २००० असा एकून ३०२००० चा माल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नापोशि राजू राठोड ब.न. २०८५ पोस्टे बेलायांचे लेखी रिपोर्ट वरुन ट्रॅक्टर क्र एम.एच. ४० बीजे ४८५२ चे चालकाविरुध्द पो.स्टे. बेला अप क्रमांक २०२/२०२१ कलम ३७९, १०९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा ६३७ अजय चौधरी पोस्टे बेला मो.नं.९८२३१८६६८६ हे करित आहे.

## —: चोरी (जनावर ) :—

पो.स्टे. कोंढाळी :— अंतर्गत ०८ किमी अंतरावरील मौजा रिंगणाबोडी येथील निवासी रामदास अमृत भोयर यांनी दिनांक २४/१२/२०२१ रोजी रात्री आपल्या राहत्या घरीचे अंगणात खुटयाला दोन काळयाा लाल पटी अयलेल्या मोठया बकऱ्या, तसेच दोन काळया रंगाच्या लाल पटी असलेल्या लहान मोठे बोकड बांधुन ठेवले होते रात्री दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमानी खुटयाचे दावे सोडुन एकुण १२,००० रू च्या बकऱ्या चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी रामदास अमृत भोयर वय ४२ वर्ष रा.रिंगणाबोडी यांचे तोंडी रिपोर्ट अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. कोंढाळी येथे अप क्रमांक ४०९/२०२१ कलम ३७९, भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास स.फौ.दिलीप इंगळे मो.क्र. ९०११११९५२२हे करित आहे.

## —: चोरी (शेती मोटार पंप ) :—

पो.स्टे. कोंढाळी :— अंतर्गत ०६ किमी अंतरावरील मौजा पंचधार जवळील कलकोही शिवारात राजेश शिवदासजी भालेराव वय ५१ वर्ष रा काटोल ता. काटोल जि. नागपुर यांची शेती असून सदर शेतात त्यांनी विहरीत पाण्यातील तिन पावर हाउस चा सौरउर्जेवरील लुंबी कंपनीचा मोटार पंप बसविले होते सदर मोटर पंप दिनांक २५/१२/२०२१ रोजी अज्ञात इसमांनी चोराने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी पोहवा ५०६ तांदुळकर पोस्टे कोंढाळी मो नं ९९२२३१४४२ यांचे तोंडी रिपोर्ट अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. कोंढाळी येथे अप क्रमांक ४०७/२०२१ कलम ३७९, भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास स.फौ.दिलीप इंगळे मो.क्र. ९०११११९५२२हे करित आहे.

## —: चोरी (हात—चालाकी ) :—

पो.स्टे. सावनेर :— दिनांक २४/१२/२०२१ रोजी सावनेर येथे भरत असलेले आठवडी बाजार सौ. अमरावती बाई पन्नालाल नागर वय ४६ रा. छिंदवाडा रोड घटे हॉस्पीटल सामोर सावनेर,वसंतराव लिखार यांचे घरी किरायाने हया बाजार करिता गेल्या होत्या आठवडी बाजारात कोणीतरी अज्ञात चोराने गर्दीचा फायदा घेउन त्यांचे गळयातील जूने सोन्याचे मंगळसुत्र ६ ग्रॅम वजनाचे अंदाजे किंमत १२००० रू. चे कोणीतरी अज्ञात इसमांनी नजर चुकवुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ. अमरावती बाई पन्नालाल नागर वय ४६ रा. छिंदवाडा रोड घटे हॉस्पीटल सामोर सावनेर,वसंतराव लिखार यांचे तोंडी रिपोर्ट अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे अप क्रमांक ८१२/२०२१ कलम ३७९, भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सफौ गुप्ता क्र.पोस्टे सावनेर मो क्र ९५११२४७२६१हे करित आहे.

## —: फसवणुक :—

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०२ किमी अंतरावरील पहलेवार येथील निवासी मदन गेंदलाल गुहारीकर यांना विजय गंगाधर मातकर रा. राठी ले आउट काटोल जि. नागपूर व २) प्रशांत हरीचंद शेंडे रा.केळवद सावनेर यांनी संगनमत करुन मदन गेंदलाल गुहारीकर चे विश्वास संपादण करून दिनांक २३/०८/२१ ते २३/११/२१ या कालावधीत दर त्यांना सरकारी सब्सीडीवर कमी पैशात ट्रॅक्टर मिळवून देतो असे अमिश दाखवून मदन गेंदलाल गुहारीकर व इतर दोन व्यक्तीकडून साक्षीदारा समक्ष वेळोवेळी नगदी ,व आरटीजीएस व चेक व्दारे एकूण २,९६,००० रूपये घेउन सूध्दा सरकारी सब्सीडीवर ट्रक्टर मिळवून दिला नाही व घेतलेले पैसे सुध्दा परत केले नाही

सदर प्रकरणी फिर्यादी मदन गेंदलाल गु.हारीकर वय ७९ वर्ष रा. पहीलेपार वार्ड क्र. १६ सावनेर यांचे रिपोर्ट वरुन आरोपी १) विजय गंगाधर मातकर रा. राठी ले आउट काटोल जि. नागपूर २) प्रशांत हरीचंद शेंडेरा.केळवद सावनेर विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे अप क्रमांक ८१३/२०२१ कलम ४०६,४२० भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास स.पो.नी. सतीष पाटील मो क ८८०५२५३९८२ हे करित आहे.

## —: सदोष मनुष्य वध :—

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०४ किमी अंतरावरील मौजा सिर्साावाडी येथे महाक्रेट पाईप इंडस्टीज कंपनी असून या कंपनीमध्ये दिनांक २४/१२/२१ चे ०९/०० वा दरम्यान चंदन जगदीश शहा वय १५ वर्ष रा. भिमपुर जि. सुप्रॉल रा. बिहार हा मजुर हा हातात सब्बल घेवून सिमेंटचे पाईप सरकवित असताना पाईप खाली पडल्याने त्याचा मृत्यु झाला. काटोल पोलीसांने मिळालेल्या सुचनेनुसार घटनास्थळाच निरीक्षण केले असता चंदन जगदीश शहा वय १५ वर्ष रा. भिमपुर जि. सुप्रॉल रा. बिहार चे अंगावर स्वताचे जिवीताचे सुरक्षे संबंधाने हेल्मेट किंवा इतर कोणतेही साहीत्य दिसून आले नाही. कंपनीचे सर्व कार्य मॅनेजर विपूल कूमार देवाजीभाई भादानी वय ३२ वर्ष रा सूलतानपूर तगोडंल जि राजकोट ह.मू. महाक्रेट पाईप इंडस्टीज कंपनी मौजा सिर्सावाडी ता काटोल हे पाहत असुन व त्याना सदरचे कामकाज धोकादायक असल्याची पूर्ण जाणीव असुन सुध्दा त्यांनी नमुद अल्पवयीन मतृक नामे चंदन जगदीश शहा वय १५ वर्ष रा. भिमपुर जि. सुप्रॉल रा. बिहार यास अवजड कामाचे प्रशिक्षण नसताना काम करण्यास लावल्यामूळे त्याचे अंगावर सिमेन्टचे पाईप पडल्यामूळे त्याचे मृत्युचे जबाबदार मॅनेजर असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी नापोशि/१२६५ अमित रिंके पोलीस स्टेशन काटोल मो नं ७५१७७०३३८९ यांचे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी मॅनेजर विपूल कूमार देवाजीभाई भादानी वय ३२ वर्ष रा सूलतानपूर तगोडंल जि राजकोट ह.मू. महाक्रेट पाईप इंडस्टीज कंपनी मौजा सिर्सावाडी ता काटोल याचे विरुध्द पो.स्टे. काटोल येथे अप क्रमांक ६७५/२०२१ कलम ३०४ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सपोनि मनोज चौधरी सा. पो.स्टे. काटोल मो.क्र ८९७५७५५९६९ हे करित आहे.

## —: विनयभंग :—

पो.स्टे. मौदा :— दिनांक २५/१२/२०२१ रोजी पो.स्टे. सावनेर ला हजर येवून अल्पवयीन मुलीनी आपली तोंडी रिर्पोट नोंदविली की, आज सकाळी ती आपले घराची साफसफाई करीत असता कपील वासुदेव ठाकरे वय २५ वर्श रा.मोहाडी ता. मौदा त्याचे घरामध्ये येउन तिचा लहान वयाचा असल्याचा फायदा घेउन तिचा हात पकडुन खाली पाडुन गालावर दोन—तिन थापड मारुन तिला उचलुन वाईट नजरेने पाहुन हॉलचे बेडवर पाडले असता मुलीने जोर—जोरात आरडा—ओरड केल्यामुळे कपील वासुदेव ठाकरे वय २५ वर्श रा.मोहाडी ता. मौदा यांनी घरातील हॉलमधील टेबल पाडुन व टि.व्ही. फोडुन नुकसान करुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी कपील वासुदेव ठाकरे वय २५ वर्श रा.मोहाडी ता. मौदा याचे विरुध्द पो.स्टे. मौदा येथे अप क्रमांक ७३७/२०२१ कलम ४५२,३५४,३५४ (अ)(१)(२),४२७,भादवी आर/डब्लु १२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात असून पुढील तपास मसपोनि सुप्रीया धुमाळ मो.क्र.९९७०८४८६८८ हे करित आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर